# प्रस्तावना

वर्धा जिल्हा गॅझिटिअर हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ प्रकाशित करताना मनस्वी आनंद होत आहे. दीड-दोन वर्षे केलेल्या परिश्रमांची फलश्रुती या ग्रंथरुपाने मी अभ्यासकांसमोर ठेवीत आहे. हा ग्रंथ ऐतिहासिक संदर्भ साहित्यात बहुमोल भर घालीत आहे असा विश्वास वाटतो. वास्तविकपणे गॅझिटिअर-निर्मिती ही एक स्वतंत्र विद्याशाखा झालेली आहे. त्यामुळे गॅझेटिअरची संकल्पना स्थितिशील राहणे असंभव आहे. गॅझेटिअर म्हणजे केवळ प्राकृतिक भूस्वरुप, नद्या, पर्वत व स्थळांची भौगोलिक माहिती आणि लोक, राजघराण्यांचा इतिहास, आर्थिक स्थिती, महसूल प्रशासन आणि पुरावशेषांचाा तपशील देणारा कोश नव्हे. जुनी संकल्पना प्रमाण मानून गॅझेटिअरची कक्षा संकुचित करणे योग्य होणार नाही. नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे प्रत्येक विषयाच्या विविध पैलूंचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक आहे. नवीन साहित्याच्या आधारे राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक इतिहासावर नवा प्रकाश टाकणे अपरिहार्य आहे. या दृष्टिकोनातून विद्यमान ग्रंथ लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठीमधील जिल्हा गॅझिटिअर मालिकेतील हे तिसरे पुष्प.

वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची पहिली इंग्रजी आवृती आर. व्ही. रसेल या आय. सी. एस. अधिका-याने संपादित करुन १९०६ मध्ये प्रकाशित केली. या आवृत्तीचे पुनर्मुद्रण करुन आम्ही अभ्यासकांना उपलब्ध करुन दिली आहे. इ.स. १९०६ पूर्वीसुध्दा या प्रदेशाची माहिती असलेले गॅझेटिअरसदृश साहित्य उपलब्ध होते. तथापि रसेलची निर्मिती हेच पहिले वर्धा गॅझेटिअर मानावे लागते. इंग्रज अधिकारी व स्थानिक जाणकारांच्या मदतीने रसेलने हा ग्रंथ तयार केला होता. हा ग्रंथ खचितच अभ्यासपूर्ण होता. त्याची खास विशेषता म्हणजे प्रमुख जातींची समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून दिलेली माहिती. ही माहिती पंडित हिरालाल यांनी संकलित केली होती. रसेलने लिहून ठेवलेला इतिहास मात्र तत्कालीन अपु-या आधारसाहित्यावर आधारलेला असल्याने त्यात ब-याच त्रुटी आहेत. त्याकाळी अज्ञात असलेल्या, तथापि नंतरच्या संशोधनाने महान राजघराणे म्हणून मान्यता पावलेल्या, वाकाटक सम्राटांचा रसेलने नामोल्लेख देखील केलेला नाही. वाकाटकांची राजधानी प्रवरपूर तथा पवनारला होती, हे रसेलच्या काळी ज्ञात नव्हते. महसूल प्रशासनाचा इतिहास मात्र फार चांगला आहे.

इ. स. १९७४ मध्ये वर्धा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअरची सुधारित इंग्रजी आवृत्ती निघाली. त्यात प्राचीन काळ व मध्ययुगीन काळावरील इतिहास प्रथमच पध्दतशीर लिहिण्यात आला. नागपूरच्या भोसले राजवटीबाबत विपूल माहिती देण्यात आली. आधुनिक काळावर मात्र भर देण्यात आला नव्हता.

इतिहास लेखन ही एक संशोधन प्रक्रीया आहे. नवनवीन संशोधन, स्वातंत्र्य आंदोलनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, आधुनिक काळातील भारतीयांच्या आशाआकांक्षा व त्यासाठी त्यांनी केलेले आंदोलन यांचा परामर्श इतिहास लेखकास घेणे आवश्यकच असते. विद्यमान वर्धा गॅझेटिअरमध्ये आधीच्या आवृत्तींमधील त्रुटी भरुन काढण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. स्वाभाविकपणे हा ग्रंथ पूर्वीच्या आवृत्तींचे भाषांतर अथवा रुपांतर नसून नवीन संशोधनपर लेखनाचा अंतर्भाव असलेली ही नवनिर्मिती आहे. इ. स. १९७४ च्या आवृत्तीतील १९ प्रकरणांची पुनर्रचना करुन नवीन आकृतिबंधानुसार १२ प्रकरणे समाविष्ट करण्यात आलेली आहेत. पूर्वीच्या आवृत्तींमधील सर्वच माहिती उद्धृत न करता आवश्यक तेवढा भाग घेण्यात आलेला आहे. नवीन बाबींवर प्रकाशझोत टाकलेला आहे. घराण्यांच्या इतिहासावर भर न देता समाजाच्या सांस्कृतिक व आर्थिक स्थितीबाबत ऐतिहासिक माहिती देण्याचा प्रयत्न केलेला आहे. नवीन आधारसाहित्य, राष्ट्रीय अभिलेखागारातील अस्सल कागदपत्रे व गृह विभागातील गोपनीय आहवाल, शोध प्रबंध, पुस्तके, नियतकालिके, शासकीय कार्यालयांमधून प्राप्त झालेली मूलभूत माहिती, तसेच क्षेत्रीय सर्वेक्षण व जाणकार नागरिकांशी केलेल्या चर्चेव्दारे उपलब्ध माहितीचा समावेश विद्यमान ग्रंथात केलेला आहे. महात्मा गांधींचे संकलित वाङ्मय, ब्रिटिश गुप्तचरांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील अहवाल आणि पुरावशेषांच्या संशोधनाचा उपयोग करून हा ग्रंथ समृध्द करण्याचा प्रयत्न केलेला आहे. पवनार, खैरवाडा, टाकळघाट, भागीमहारी, नैकुंड, माहुरझरी, जुनापानी व कुही-मांढळ परिसरात झालेल्या संशोधनाच्या आधारे प्रागितिहासकालीन व इतिहासकालीन संस्कृतीचे वर्णन दिले आहे. पवनारच्या गंगा भगवतीची मूर्ती फ्रेंच शिल्पाकृतींची बरोबरी करू शकेल इतकी आकर्षक आहे. सातवाहन, वाकाटक, कलचुरी, राष्टकूट, कल्याणीचे चालुक्य व यादव कालखंडाचा इतिहास दिला आहे. अलाउद्दीन खलजीच्या विजयानंतर दक्षिणेत बहमनींचा प्रभावी राजवंश उदयास आला. बहमनीकालीन सामाजिक व धार्मिक स्थिती, गोंड राजे, वहाडचे अकबराला अभ्यर्पण, मुघलकालीन प्रशासन व्यवस्था व नागपूरकर भोसलेंचा इतिहास लिहिला आहे.

आधुनिक काळाचा इतिहास या ग्रंथाची एक खास विशेषता आहे. महात्माजींच्या वास्तव्याने पुनीत झालेले सेवाग्राम म्हणजे तत्कालीन भारताची अशासकीय राजधानी. गांधीजींनी १९३४ मध्ये

वर्ध्यास स्थलांतर केल्यापासून भारताचे भवितव्य घडविणारे अतिशय महत्वाचे निर्णय या परिसरात घेण्यात आले. तेव्हापासून काँग्रेस आंदोलनाचे सूत्रसंचालन सेवाग्रामहून होऊ लागले. महान दानशूर दाता, गांधीवादी साधक, विशाल क्रियाशीलता व वैराग्यमूर्ती असलेले जमनालालजी बजाज यांचे राष्ट्रवादी कार्यातील स्थान फार मोठे होते. महात्माजी व जमनालालजींच्या प्रेरणांमुळे अखिल भारतीय पातळीवर विधायक कार्य करणा-या अनेक गांधीवादी संस्था येथे उदयास आल्या. स्वाभाविकपणे वर्धा-सेवाग्राम-पवनार परिसर देशप्रेमी भारतीयांचे तिर्थक्षेत्र बनला. राष्ट्रवादी चळवळीचे केंद्रस्थान असलेल्या सेवाग्रामला प्रत्येक पुढा-याचे अनेकवेळी आगमन झाले. तसेच जगातील असंख्य राजकीय पुढा-यांचे व विचारवंतांचेही आगमन झाले. वर्धा-सेवाग्रामचा १९३४ पासूनचा इतिहास स्फूर्तिदायक तसेच बोधप्रद आहे.

गांधीजींनी १९४० च्या वैयक्तिक सत्याग्रहाची सिध्दता केली सेवाग्राममधूनच. पवनार आश्रमस्थ विनोबाजी भावे हे तर वैयक्तिक सत्याग्रहातील देशाचे पहिले सत्याग्रही होते. भारतालाच नव्हे तर संपूर्ण ब्रिटिश साम्राज्यास प्रभावी हादरा देणा-या छोडो भारत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला वर्धा-सेवाग्रामलाच. छोडो भारतची सत्याग्रही युध्दनीती ठरविण्यात आली येथूनच. `वर्धा ठराव` आणि ७-८ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत भरलेली अखिल भारतीय काँग्रेस समितीचे अधिवेशन या दरम्यान खूप हालचाली झाल्या. संपूर्ण देशामधून कार्यकर्ते गांधीजींचे मार्गदर्शन घेण्यास येऊन गेले. छोडो भारत क्रांतीमध्ये वर्धा जिल्ह्याने मोठे योगदान दिले. आष्टी-चिमुरच्या स्वातंत्र्य समराने भारतीयांची मने हेलावून गेली. प्रा. जे. पी. भंसाळीचे ६२ दिवसांचे ऐतिहासिक उपोषण म्हणजे स्वातंत्र्य आंदोलनातील अत्याचाराविरुध्द केलेला हा जीवनमरणाचा लढा होता. स्वातंत्र्य आंदोलनातील दुःखद घटना व हुतात्म्यांचा या ग्रंथात उल्लेख केलेला आहे. आपल्या उपोषणाबाबतची भूमिका स्पष्ट करणारे प्रा. भंसाळींचे अप्रकाशित निवेदन इतिहास प्रकरणात छापले आहे. छोडो भारताबाबतचा वर्धा ठराव व मुंबई ठराव यांचा मसुदा जोडलेला आहे. गुप्तवार्ता पोलिसांचे अहवाल, ब्रिटिश श्रेष्ठींचा पत्रव्यवहार, कलेक्टेड वर्क्स ऑफ महात्मा गांधी, गोपाळराव वाळुंजकरांचे ``ग्रामसेवा मंडळाचा इतिहास`` हे हस्तलिखित, ट्रान्स्फर ऑफ पॉवर डॉक्युमेन्टस यावरील पहिले चार खंड आणि इतर कागदपत्र तसेच मान्यवर पुस्तकांच्या आधारावर हा इतिहास लिहिला आहे. सत्याच्या अधिकाधिक जवळ जाण्यासाठी हा इतिहास प्रत्यक्ष स्वातंत्र्य संग्रामात सहभागी झालेल्या अनेक स्वातंत्र्य सैनिकांना मी समक्ष दाखविलेला आहे. त्यांच्या सूचनांबरहुकूम लेखनात बदलही केले आहेत.

विद्यमान ग्रंथाची दुसरी खास विशेषता म्हणजे ``लोक`` आणि ``संस्कृति`` या विषयांवर लिहिलेली अभ्यासपूर्ण प्रकरणे. जिल्ह्यातील प्रमुख जाती व जमातींची समाजशास्त्रीय माहिती दिली आहे. प्रत्येक जातीच्या लोकांमधील पोटभेद, रूढी व चालीरीती याबाबतची माहिती प्रकाशित पुस्तके व अहवालांव्यतिरिक्त प्रत्यक्ष सर्वेक्षणाव्दारे तपासून पाहिली आहे. शक्यतो वस्तुनिष्ठ माहिती देण्याचा प्रयत्न आहे. जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा, हिंदू धर्मपंथ, संत परंपरा, साहित्यिक, संगीत, शिल्पकला आणि चित्रकलेचे विवेचन दिले आहे. भूगोल, अर्थव्यवस्था, प्रशासन आणि स्मारकशिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची बरीच माहिती दिली आहे. ब-याच माहितीची सत्यता प्रत्यक्ष सर्वेक्षणाव्दारे पडताळून पाहिली आहे. तरीसुध्दा काही त्रुटी अनवधानाने राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. एवढे मात्र खरे की, ग्रंथातील माहिती संकलित केल्यानंतर प्रकाशनास विलंब होत असल्याकारणाने त्यामध्ये मंदन अवधी (Time-lag) गेलेला आहे.

महत्वाची स्मारकशिल्पे व प्रेक्षणीय स्थळांची रंगीत व कृष्णधवल छायाचित्रे आणि खास तयार करून घेतलेले नकाशे दिलेले आहेत. विस्तृत संदर्भ सूची आणि नाम व विषय निर्देश सूचीनेही ग्रंथाची उपयुक्तता वाढलेली दिसेल. मात्र जिल्ह्यातील गावांची दर्शिका १९७४ च्या आवृत्तीत दिलेली असल्याने स्थलसंकोचास्तव या आवृत्तीत देणे शक्य झाले नाही.

जिल्हा गॅझेटिअर मालिकेव्यतिरिक्त राज्य स्तरावरील मालिकेत इतिहास (३ खंड), वनस्पतीशास्त्र (४ खंड), महाराष्ट्र-भूमि व लोक, भाषा व साहित्य आणि प्राणिशास्त्र या महत्वाच्या विषयांवरील ग्रंथ या विभागाने इंग्रजीत प्रकाशित केलेले असून ``इतिहास : आधुनिक काळ`` आणि ``भूगोल`` यावरील इंग्रजीतील उर्वरित ग्रंथांचे लेखन सुरू आहे. या ग्रंथांची उपयुक्तता मोठी आहे.

या ग्रंथातील बरेच लेखन कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांनी केलेले असून इतिहास, भूगोल, भूशास्त्र व खनिज संपत्ती आणि संस्कृति या विषयांवरील लेखन सहयोगकर्त्या लेखकांकडून करून घेतलेले आहे. सखोल संपादकीय तपासणीनंतर सर्व मजकूर महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर संपादक मंडळातील संबंधित विषयांचे तज्ञ असलेल्या सभासदांनी तपासून दिला. तत्कालीन संपादक मंडळातील पुढील सदस्यांचा ऋणनिर्देश करणे माझे कर्तव्य आहे :-

(१) सचिव, सामान्य प्रशासन विभाग, श्री. रा. च. अय्यर (अध्यक्ष)

(२) डॉ. भा. ल. भोळे

(३) श्री. द्वा. भ. कर्णिक

(४) डॉ. अ. प्र. जामखेडकर

(५) डॉ. चं. धुं. देशपांडे

(६) प्रा. या. शि. महाजन

(७) डॉ. यु. म. पठाण

(८) डॉ. पी. एन. चोप्रा

(९) श्री. शं. ग. सुरडकर

(१०) डॉ. कि. का. चौधरी (कार्यकारी संपादक व सचिव).

स्वातंत्र्य आंदोलनाचे समकालीन पुरस्कर्ते व विरोधक यांनी कधी संवादी तर कधी विसंवादी भूमिका घेतलेल्या दिसतात. सविनय कायदेभंग आंदोलनानंतर अशा काही विसंवादी भूमिका प्रकट झाल्या. मात्र स्वातंत्र्यप्राप्ती हे प्रत्येकाचे ध्येय होते. विद्यमान लेखन हा तटस्थपणे लिहिलेला इतिहास होय. आणि इतिहास म्हटला की, वस्तुनिष्ठ निःपक्षपाती दृष्टी आलीच. म्हणून स्वातंत्र्य आंदोलन इतिहासाची सत्यता पडताळून पाहण्यासाठी ब-याच जाणकार लोकांशी चर्चा तर केलीच परंतु त्यांना लेखन देखील दाखविले. या कामी सक्रीय मदत करणारे कै. गोपाळराव वाळुंजकर, प्रा. ठाकूरदास बंग, श्री. वामनरावजी गावंडे, श्रीमती मदालसा नारायण, श्री. उमाशंकर शुक्ल, सौ. कमलाताई लेले, श्री. आपटे गुरुजी व श्री. के. ब. कदम यांचा ऋणनिर्देश करणे क्रमप्राप्त आहे.

विद्यमान ग्रंथाच्या संकलन व प्रकाशन प्रक्रियेमध्ये मला सहाय्य करणा-या डॉ. वि. ना. गुरव, सहसंपादक (सेवानिवृत्त), आणि श्री. शा. कृ. खिलारे, उपसंपादक, श्री. प्र. नि. नारखेडे, श्री. नि. रा. पाटील व श्री. भि. म. कौसल, संशोधन अधिकारी यांचे आभार मानतो. तसेच सौ. मा. सु. मोदिखाने, सौ. नं. श. अळवणी (सेवानिवृत्त), सर्वश्री के. झि. राऊत, ध. जि. नावडकर, वि. बा. सांगरुळकर, रा. र. हनवतकर या व इतर सहाय्यक संशोधन अधिका-यांचेसुध्दा आभार मानतो. प्रशासनिक अधिकारी या नात्याने श्री. प्र. सा. खोबरेकर यांचे सहाय्य आणि कार्यालयातील लघुलेखक, सहाय्यक व विविध स्तरांवरील कर्मचा-यांनी केलेल्या मदतीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

या ग्रंथाची छपाई उत्तम व शीघ्र गतीने करण्यासाठी श्री. प्र. शं. मोरे, संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशने, मुंबई आणि श्री. श्री. वि. केळापुरे, व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर, यांनी केलेल्या कामगिरीबद्दल त्यांचे आभार मानणे आवश्यक आहे. तसेच छायाचित्रांसाठी डॉ. अ. प्र. जामखेडकर, नागपूरचे पुरातत्व सहाय्यक संचालक श्री. वि. रा. वेरुळकर व त्यांचे छायाचित्रकार आणि जिल्हा माहिती व जनसंपर्क अधिकारी, यांचेही आभार

मानतो.

हा ज्ञानकोशसदृश ग्रंथ इतिहासकार, विद्वान, संशोधन आणि प्रशासकांना उपयुक्त वाटेल अशी आशा व्यक्त करतो.

मुंबई

९ ऑगस्ट १९९१

डॉ. कि. का. चौधरी

कार्यकारी संपादक व सचिव